सकाळ
, शनिवार, १७ ऑगस्ट २०२४

# 'जरग', 'गोयंका', 'विवेकानंद' विजेते

## शालेय टेबल टेनिस स्पर्धा : विजयी संघ विभागीय स्पर्धेसाठी पात्र

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १६ : कोल्हापूर महापालिकास्तर शासकीय शालेय टेबल टेनिस स्पर्धेत मुलांमध्ये लक्ष्मीबाई जरग विद्यामंदिर, विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालय, विद्यापीठ हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, तर मुलींमध्ये विमला गोयंका इंग्लिश मिडियम स्कूल यांनी विजेतेपद पटकाविले. कोल्हापूर महापालिका व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने आयोजित केलेल्या या स्पर्धा के.एस.ए. टेबल टेनिस केंद्रात पार पडल्या.




कोल्हापूर : के.एस.ए. टेबल टेनिस केंद्रात झालेल्या शालेय टेबल टेनिस स्पर्धेतील एक क्षण.

**१४ वर्षांखालील** मुलांमध्ये लक्ष्मीबाई जरग विद्यामंदिरने वसंतराव चौगुले इंग्लिश मीडियम स्कूलचा दोन विरुद्ध एक गुणाने पराभव करीत विजेतेपद पटकाविले. विजयी संघात अमृत शिवलकर, संकल्प बांदिवडेकर, तस्लीम मुल्लाणी, तर राधाबाई शिंदे इंग्लिश मीडियम स्कूलने विद्यापीठ हायस्कूलचा दोन विरुद्ध एक गुणाने पराभव करीत तिसरा क्रमांक पटकाविला.

मुलींमध्ये विमला गोयंका इंग्लिश मीडियम स्कूलने होलीक्रॉस हायस्कूलचा दोन विरुद्ध एक गुणाने पराभव करीत विजेतेपद पटकावले. विजयी संघात जान्हवी भोसले, तन्वी चव्हाण, निहारिका कुलकर्णी यांचा समावेश आहे, तर वसंतराव चौगुले इंग्लिश मीडियम स्कूलने माईसाहेब बावडेकर माध्यमिक हायस्कूलचा दोन विरुद्ध शून्य गुण मिळवत तिसरा क्रमांक पटकाविला.

**१७ वर्षांखालील** मुलांमध्ये विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालयाने स. म. लोहिया हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचा दोन विरुद्ध शून्य गुणांना पराभव करीत विजेतेपद पटकाविले. विजयी संघात केतन सुतार, वेदांत पाटील, वैभव जोग, शिवम गुप्ता, सोहम चव्हाण यांचा समावेश आहे, तर विमला गोयंका इंग्लिश मीडियम स्कूलने वसंतराव चौगले इंग्लिश मीडियम स्कूलचा दोन विरुद्ध शून्य गुणांनी पराभव केला.

**१७ वर्षांखालील** मुलांमध्ये विमला गोयंका इंग्लिश मीडियम स्कूलने विद्यापीठ हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचा दोन विरुद्ध शून्य गुणाने पराभव केला. या विजयी संघात निहाली पाटील, दर्शनी ढोले, अनन्या जोशी यांचा समावेश आहे.

**१९ वर्षांखालील** मुलांमध्ये विद्यापीठ हायस्कूल अँड कनिष्ठ महाविद्यालय हा एकच संघ असल्याने विजयी घोषित करण्यात आले. या संघात प्रेमसिंह बाबर, आयुष आयरेकर, धनराज पाटील यांचा समावेश आहे. अंतिम फेरीत विजयी झालेले संघ विभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरले.

17/08/24

17-8-24

तरुण भारत

शनिवार १७ ऑगस्ट २०२४




# 'आजच्या युवकांनी देशाला प्रगतीपथाकडे न्यावे'

कोल्हापूर : आजच्या युवकांनी राष्ट्र ऐक्याच्या भावनेतून देशाला प्रगतीपथाकडे न्यावे. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी विश्वबंधूत्वाची शिकवण आपल्या प्रार्थनेतून दिली. त्याचे अवलंबन युवकांनी करावे, विद्यार्थ्यांमधील ज्ञानज्योत प्रज्वलीत करण्याचे काम गुरुदेव कार्यकर्त्यांनी करावे, असे मत श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी ध्वजारोहण समारंभात बोलताना मांडले. विवेकानंद कॉलेजच्या प्रांगणात प्रमुख पाहुणे संस्थेच्या सचिव मा.प्राचार्या सौ. शुभांगी गावडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करणेत आले. एन.सी.सी.च्या विद्यार्थ्यांनी शानदार परेड संचलन सादर केले.

यावेळी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या परिसरातील शाखा प्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यावेळी विवेकानंद कॉलेजमधील पुस्तक लेखक, सेट, पीएच.डी. पदवी प्राप्त प्राध्यापकांचा सत्कार विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचे हस्ते करणेत आला. यावेळी झुलॉजी विभाग प्रमुख डॉ.जी.के.सोनटक्के यांच्या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

प्रास्ताविक स्टाफ सेक्रेटरी प्रा.ए.बी. वसेकर यांनी केले, आभार स्टाफ सेक्रेटरी प्रा डॉ ए बी दांगट यांनी मानले. सुत्रसंचालन प्रा.सुप्रिया पाटील व प्रा. [illegible] यांनी केले.